# घटक :- भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आव्हाने :

आव्हाने
- लोकसंख्या
- दारिद्र्य
- बेकारी
- इतर

## लोकसंख्या

⇒ २०११ च्या जनगणनेनुसार भारतीय लोकसंख्या - १२१.०२ कोटी - जगात २ क्रमांक :
दरवर्षी १.८ कोटीची भर - (ऑस्ट्रेलिया एकूण लोकसंख्येएवढी)

### भारतीय लोकसंख्येची वैशिष्ट्ये :

① प्रतिकूल भूमी मानव प्रमाण :-

क्षेत्रफळ जगाच्या २.४% लोकसंख्या मात्र जगाच्या १७.५%

② उच्च जन्मदर व कमी मृत्युदर :-

२०११ - जनगणनेनुसार - जन्मदर दर हजारी २०.९७ तर मृत्युदर ७.४८ इतका.

③ प्रतिकूल स्त्री-पुरुष प्रमाण :

प्रतिहजार पुरुषांच्या मागे स्त्रियांचे प्रमाण केवळ ९१४

④ कमी स्त्री साक्षरता दर :

२००१ मध्ये साक्षरता : ६५.३८% (पुरुष ७५.८% स्त्रिया ५२.१%)
२०११ मध्ये साक्षरता : ७५.८% (पुरुष ८२.१४% स्त्रिया ६२.४६%)

⑤ लोकसंख्येची घनता :

प्रति चौरस किलोमीटर मध्ये राहणाऱ्या लोकांचे प्रमाण म्हणजे लोकसंख्येची घनता.
भारतात लोकसंख्येची घनता ३८२

⑥ ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त :

२०११ - मध्ये ग्रामीण लोकसंख्या ६८.८४%
शहरी लोकसंख्या ३१.१६%

⑦ सरासरी आयुर्मानात वाढ :

१९५१ मध्ये - आयुर्मान ४१.२ वर्षे
२००१ —॥— ६५.३ वर्षे
२०११ —॥— ६६.८ वर्षे
} आयुर्मानात वाढ झालेली दिसून येते

⑧ बाल मृत्यूच्या दरात घट

१९५१ - मध्ये प्रमाण दरहजारी १६६ एवढे
२००१ - ६१
२०११ ४७
} बालमृत्यूदरात घट झाल्याची दिसून येते :

## वयोमानाच्या रचनेतील बदल:

— भारत तरुण लोकसंख्येचा देश:

* भारताचे मध्यक वय २००१ मध्ये २२ वर्षे २०११ – २४ वर्षे

* ० ते १४ वयोगट – १९७१ मध्ये सर्वोच्च प्रमाण – ४२% } यावरून जन्मदर
२०११ मध्ये हे प्रमाण – ३०.८% } घसरत आहे.

* १५-५९ वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण १९०१ पासून १९७१ पर्यंत साधारणत: कमी होत गेले. मात्र १९७१ नंतर पुन्हा वाढून ६०.३% इतके झाले.

* ६०+ (वृद्ध) लोकसंख्येचे प्रमाण अल्प

* २००१ साली कार्यकारी लोकसंख्या प्रमाण ५७.२% तर आश्रितांचे प्रमाण – ४२.८%

## भारतीय लोकसंख्या वाढीची प्रवृत्ती:

| वर्ष | लोकसंख्या (कोटी) |
|---|---|
| १९११ | २५.२१ |
| १९२१ | २५.११ |
| १९५१ | ३६.१ |
| २००१ | १०२.८ |
| २०११ | १२१.०२ |

* १९११ ते १९२१ या काळात लोकसंख्येचा वाढीचा दर ऋणात्मक (०.३१%) होता. या दशकात लोकसंख्या वाढली तर नाही उलट कमी झाली. आतापर्यंत १८७२ नंतर १९२१ साली एकदाच झाले. १९२१ला महाविभाजक वर्ष असे म्हणतात.

कारणे: ⇒ i) १९१८ मध्ये एन्फ्लुएंझा साथ = १.२ कोटी लोक मृत्यूमुखी
ii) १९११, १३, १५, १८ आणि १९२१ साली भीषण दुष्काळ.
iii) १९१४-१८ – पहिल्या महायुद्धात हजारो भारतीय सैनिक मृत्यूमुखी.

### संथ वाढीचा काळ – १९२१-५१

२५१ दशलक्षाहून ३६१ दशलक्षापर्यंत – (४३.८% नी वाढ) म्हणून या काळास संथ वाढीचा काळ म्हणतात.

* या काळात जन्मदरात काहीशी घट पण मृत्यूदरात घट झाल्याने लोकसंख्या वाढून आली म्हणून या वाढीला मर्त्यताधारित वाढ म्हणतात.

### वेगवान उच्च वाढीचा काळ – १९५१-८१

१९५१ नंतर मृत्यू दरात वेगाने घट झाली मात्र जन्मदर उच्च स्तरावरच राहिला त्यामुळे लोकसंख्या खूपच उच्च दराने वाढली. या काळास लोकसंख्येच्या विस्फोटाचा काळ म्हणतात.

कारणे – i) १९५१ ते ८१ – काळात मृत्यू दर २८ प्रतिहजारावरून १२ प्रतिहजारापर्यंत }
मात्र जन्मदर ४० —॥— ३४ प्रति —॥— } जननाधारित
त्यामुळे नैसर्गिक वाढीचा दर १३ हून २२ प्रति —॥— } वाढ

लोकसंख्या ५१ ते ८१ दरम्यान ३६१ दशलक्षाहून ६८३ दशलक्षापर्यंत – वाढ ८९.३६%.

Scanned by CamScanner

## * लोकसंख्येच्या स्थित्यंतराचा सिद्धांत:

* पहिली अवस्था ⇒ जन्मदर [जास्त] मृत्यूदर [जास्त] – वाढ [कमी] – १८९१ ते १९२१ ①
* दुसरी अवस्था ⇒ जन्मदर [स्थिर] मृत्यूदर वेगाने [कमी] – वाढ [मोठी] – लोकसंख्येचा विस्फोट
* तिसरी अवस्था ⇒ जन्मदर [कमी] मृत्यूदर [कमी] – वाढ [कमी]

## * भारतातील सरासरी वार्षिक जन्मदर व मृत्यूदर:

| वर्ष | जन्मदर | मृत्यूदर |
|---|---|---|
| १८९१-१९०० | ४५.८ | ४४.४ |
| १९०१-१९१० | ४८.१ | ४२.६ |
| १९११-१९२० | ४९.२ | ४८.६ |
| १९२१-१९३० | ४६.४ | ३६.३ ↓ |
| १९३१-१९४० | ४५.२ | ३१.२ ↓ |
| १९४१-१९५० | ३९.९ | २७.४ ↓ |
| १९५१-१९६० | ४०.० | १८.० |
| १९६१-१९७० | ४१.२ | १९.२ |
| १९७१-१९८० | ३७.२ ↓ | १५. ↓ |
| १९८१-१९९० | ३२.६ ↓ | ११ ↓ |
| २००८-२००९ | २२.८ ↓ | ७.४ ↓ |
| — . २०११ | २०.९७ ↓ | ७.४८ |

## * लोकसंख्या विस्फोटाची कारणे:

① **उच्च जन्मदर:** त्याची कारणे.
1) सार्वत्रिक विवाह.
2) लवकर विवाह – प्रजोत्पादन कालावधी अधिक.
3) निरक्षरता – मोठ्या परिवारास महत्व.
4) दारिद्र्य – मुले-देवाची देणगी, अतिरिक्त मुले अधिक उत्पन्न समज
5) उष्ण हवामान.
6) एकत्र कुटुंबपद्धती
7) स्त्रियांचा निम्न दर्जा.

② **मृत्यूदर कमी होणे:** त्याची कारणे.
1) नैसर्गिक आपत्तीवर नियंत्रण.
2) आरोग्य सुविधा सुधारणा.
3) जीवनमानाच्या दर्जात सुधारणा – अन्न, शिक्षण, वस्त्र, निवारा
4) शिक्षण.
5) इतर – बालमृत्यूत घट, माता मृत्युदरात घट, सामाजिक सुधारणा, नागरिकरण

Scanned by CamScanner

## लोकसंख्या विस्फोटाचे परिणाम:

१) लोकसंख्या वाढीचा भूमीवर भार:

२. १९२१ मध्ये लो. घनता ८१ प्रतिचौ.किमी.
२०११ मध्ये — ॥ — ३८४ — ॥ —

२) शेतीवरील वाढता भार:
लघु व सीमान्त शेतकरी निर्माण झाले.

३) वाढती बेकारी: १९९९-२००० मध्ये २६.५८ दशलक्ष बेकार.

४) अन्नधान्याची समस्या: शेतीयोग्य जमीनीचे प्रमाण कमी

५) पर्यावरणीय समस्या: जंगले नष्ट झाली. नै. साधनांचा अतिवापर.

६) सामाजिक समस्या: अपुरे परिवहन, पिण्याच्या शुद्ध पाण्याचा प्रश्न, निवारा, स्वच्छतागृहे, परिणामी व्यसनाधिनता, तस्करी, फसवणूक, गुन्हे, खून, दहशतवाद.

## भारतातील शैक्षणिक क्षेत्रातील वाढ:

⇒ भारतीय अर्थव्यवस्था सर्वात तरुण अर्थव्यवस्था: ६५% लोकसंख्या ३५ वर्षाखालील त्यामुळे शिक्षणाची मागणी अधिक.

⇒ सन २०१० मध्ये प्रत्येक मुलाला मुक्त व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क प्राप्त.
RTE- Right to Education एप्रिल 2009 - अंमलबजावणी एप्रिल 2010.

## लोकसंख्या विस्फोटावर प्रतिबंधात्मक उपाय:

अ) आर्थिक उपाययोजना: औद्योगिक क्षेत्राचा विस्तार, रोजगार निर्मिती, दारिद्र्य-निर्मूलन इ. मुळे राहणीमानाच्या दर्जात सुधारणा होऊन लहान कुटुंबाच्या फायद्याची जाणीव.

ब) सामाजिक उपाययोजना: यामुळे अंधश्रद्धा, अज्ञान व जीवन जगण्याचा पारंपारिक मार्ग बदलतो. स्त्रियांचा दर्जा सुधारल्याने त्या कुटुंबाचे आकारमान ठरवू शकतील.

क) कुटुंबनियोजन कार्यक्रम: भारत सरकारने १९५२ मध्ये कुटुंबनियोजन कार्यक्रम हाती घेतला. या संदर्भात प्रचार व सल्ला देण्यासाठी कुटुंबनियोजन केंद्रे स्थापन करण्यात आली. लोकसंख्या प्रतिबंधात्मक साधनांचे मोफत वाटप करण्यात आले.

Scanned by CamScanner

# * दारिद्र्य *

⇒ दारिद्र्य - व्याख्या ⇒ मुलभूत गरजा न भागवता येण्यासारखी सामाजिक परिस्थिती.

⇒ मुलभूत गरजांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य यांचा समावेश.

⇒ दारिद्र्याचे प्रकार - ② ⇒ 1) निरपेक्ष दारिद्र्य
2) सापेक्ष दारिद्र्य.

**निरपेक्ष दारिद्र्य (Absolute Poverty)** ⇒ न्यूनतम स्तरापेक्षा कमी उपभोग करणाऱ्या लोकसंख्येला गरिब समजले जाते. शहरी भागातील जी व्यक्ती दररोज २१०० कॅलरिज व ग्रामीण भागात दररोज २४०० कॅलरीज उपभोगावर खर्च करु शकत नाही ती व्यक्ती निरपेक्ष गरीब समजली जाते. किमान आवश्यक गरजा भागवण्याची क्षमता नसणे.
भारतात न्यूनतम उपभोग स्तरयलाच दारिद्र्य रेषा असे म्हणतात.

**सापेक्ष दारिद्र्य (Relative Poverty)** ⇒ सापेक्ष दारिद्र्याची संकल्पना ही कमी उत्पन्न गटाची उच्च उत्पन्न गटाशी केलेल्या तुलनेवर आधारित आहे.
सापेक्ष दारिद्र्य - वेगवेगळे गट, वेगवेगळ्या प्रदेशातील लोकांच्या जीवनमानातील फरकावर अवलंबून असते.
सापेक्ष दारिद्र्या मार्फत देशातील संपत्ती, उत्पन्न किंवा उपभोगाच्या वितरणातील विषमतेचे चित्र स्पष्ट होते.

**दारिद्र्य रेषा** ⇒ भारतात दारिद्र्याचे प्रमाण मोजण्यासाठी दारिद्र्य रेषा या संकल्पनेचा वापर केला जातो. या काल्पनिक रेषेमुळे दारिद्र्य रेषेखालील जनता (BPL) व दारिद्र्य रेषेवरील जनता (APL) असे अर्थव्यवस्थेचे दोन भाग करते.

⇒ दारिद्र्य रेषा 'उपभोग खर्चाच्या' आधारावर काढली जाते. त्यासाठी एका व्यक्तीमागे एका महिन्याच्या उपभोग खर्चाचा एक न्यूनस्तर निश्चित केला जातो त्याला मासिक प्रतिव्यक्ती उपभोग खर्च (MPCE) म्हणतात. हा खर्च जगण्यासाठी आवश्यक असलेल्या अन्न व गैरअन्न वस्तू व सेवांच्या उपभोगासाठीचा किमान खर्च दर्शवितो. त्याचे आकडे निश्चित करण्यासाठी NSSO - च्या घरगुती उपभोग खर्च सर्वेक्षणाची आकडेवारी वापरली जाते. NSSO - दर पाच वर्षांनी असे सर्वेक्षण करते. आकडेवारी जमा करताना तीन पर्यायी रिकॉल पिरियड्स चा वापर करते.

⇒ रिकॉल पिरियड्स म्हणजे NSSO ने घरगुती उपभोग खर्चाच्या सर्वेक्षणासाठी गृहीत धरलेला संदर्भ कालावधी.

1) युनिफॉर्म रिकॉल पिरियड (URP) ⇒ सर्व उपभोग्य वस्तुंचा 30 दिवसांच्या कालावधीतील उपभोगाच्या आकडेवारीचा समावेश.

2) मिक्स्ड रिकॉल पिरियड (MRP) ⇒ यामध्ये 5 प्रकारच्या अधूनमधून खरेदी करण्यात येणाऱ्या गैर-खाद्य वस्तूंसाठी (कपडे, चपला, टिकाऊ वस्तू, शिक्षण, आरोग्य यासाठी ३६५ दिवस कालावधी व उर्वरित वस्तू 30 दिवस -

3) मॉडिफाईड मिक्स्ड रिकॉल पिरियड (MMRP) ⇒ तीन संदर्भ कालावधी.
i) 365 दिवस = कपडे, चपला, शिक्षण, आरोग्य, टिकाऊ वस्तू - खर्च
ii) 7 दिवस = खाद्यतेल, अंडी, मांस, फळे व भाज्या
iii) 30 दिवस = इंधन, भाडे, कर, गैरसंस्थात्मक आरोग्य सेवा इ. खर्च.

Scanned by CamScanner

या आधारावर तीन दारिद्र्य रेषा केल्या जातात.
i) अखिल भारतीय दारिद्र्य रेषा = संपूर्ण भारतासाठी
ii) राष्ट्रीय ग्रामीण दारिद्र्य रेषा = ग्रामीण भागासाठी
iii) राष्ट्रीय शहरी दारिद्र्य रेषा = शहरी भागासाठी.

## दारिद्र्याची कारणे :

i) वेगाने वाढणारी लोकसंख्या
ii) मंद विकास दर - रोजगाराची वाढ ही आर्थिक वृद्धीवर अवलंबून असते.
iii) उत्पन्न व संपत्तीतील विषमता = योजना आयोगाच्या मते उत्पन्न व संपत्तीचे असमान वाटप - गरिबीचे कारण - अविकसितपणा व आर्थिक असमानता. २००१ - जागतिक विकास अहवालानुसार २०% श्रीमंत → ४६.१ उत्पन्नाचा भाग
२०% गरीब → ८.१ —॥—
iv) भूसुधारणा कायद्याची अकार्यक्षम कार्यवाही
v) अशिक्षितपणा
vi) नैसर्गिक आपत्ती
vii) दारिद्र्याचे दुष्टचक्र - (कमी उत्पादन - भांडवल - गुंतवणूक - बचत - दरडोई - रा. उत्पन्न)
viii) महागाई - (सामान्य किंमत पातळीतील वाढ) क्रयशक्तीवर परिणाम.
ix) अर्धविकसितता
x) प्रादेशिक असमतोल.
xi) सामाजिक घटक - रुढी, परंपरा, सार्वत्रिक विवाह, कर्जबाजारीपणा, जातीप्रथा, धार्मिक श्रद्धा

## दारिद्र्याचे परिणाम :

**आर्थिक परिणाम.**
१) अल्प राष्ट्रीय उत्पन्न
२) वाढती बेकारी,
३) अल्प बचत व गुंतवणूक
४) अल्प उत्पादन
५) अल्प भांडवल निर्मिती

**सामाजिक परिणाम.**
१) वर्गसंघर्ष
२) जनतेची दयनीय परिस्थिती
३) असामाजिक कृत्ये
४) राष्ट्र विघातक कृत्ये.

## भारतातील दारिद्र्य मोजमाप पद्धतीची उत्क्रांती :

भारतात दारिद्र्य रेषेच्या मोजमापासाठी नियोजन मंडळाने वेळोवेळी कार्यगट स्थापन केले.

१) कार्यगट १९६२ ⇒ दरमहा ५ व्यक्तीच्या कुटुंबासाठी राष्ट्रीय किमान उपभोग खर्च - रु १००प्रति माह किंवा प्रति व्यक्ती 20प्रति माह (१९६०-६१ च्या किंमतीच्या संदर्भ)
* केवळ अन्नावरील खर्च गृहीत धरण्यात आला.
* आरोग्य व शिक्षण खर्च वगळण्यात आला. (कारण आरोग्य व शिक्षण जबाबदारी शासनाची)

२) अलग कार्यगट १९७९ - जुलै १९७७मध्ये वाय. के. अलग यांच्या अध्यक्षतेखाली. अहवाल १९७९
* मोजमापासाठी कॅलरी उपभोगाच्या संकल्पनेचा वापर.

Scanned by CamScanner

* ग्रामीण ⇒ २४०० कॅलरी / व्यक्ती / दिन } निकष - प्रति दिन - 1.64रु व प्रति मास - 49.09
  शहरी ⇒ २१०० कॅलरी / व्यक्ती / दिन } प्रति दिन 1.88रु व प्रति मास - 56.64
* त्यावरून MPCE निश्चित करण्यात आले.

यानुसार १९७३-७४ मध्ये ५४.९% दारिद्र्य

* राज्यांसाठी वेगळ्या दारिद्र्य रेषेची गणना केली नाही.

## ३) लकडावाला तज्ज्ञ गट : १९९३ ⇒ सप्टें १९८९ मध्ये डी.टी. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखाली.

जुलै १९९३ ⇒ अहवाल - स्विकार मार्च १९९७ पासून.

* अखिल भारतीय दारिद्र्य रेषेचे विभाजन करुन राज्य ग्रामीण दारिद्र्य रेषा व राज्य शहरी दारिद्र्य रेषा निश्चिती.
* कॅलरीमूल्य हाच निकष कायम.
* खर्चाची पातळी - 49रु - ग्रामीण व 57रु शहरी - हेच प्रमाण तेच ठेवून चलनवाढीचा दर विचारात घेवून 211.30रु -॥- व 274.88 -॥- केली.

या नवीन निकषानुसार 1993-94 मध्ये 36% दारिद्र्य - ग्रामीण - 37.3% व शहरी 32.4%.

* या गटाने MPCE चे मोजमाप URP रिकॉल पिरियडचा वापर करुन केले.

## ४) सुरेश तेंडुलकर समिती तज्ज्ञ गट : २००५ ⇒ सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर २००५

मध्ये तज्ज्ञ गट = ८ डिसें २००९ अहवाल. जाने. २०११ - शिफारशी स्विकार

* या तज्ज्ञ गटाने कॅलरीच्या निकषाचा वापर सोडून देण्याची शिफारस केली. कारण गटाच्या मते कॅलरी उपभोग व पोषण यामध्ये कमी संबंध आहे.
* अन्न, आरोग्य, शिक्षण व कपडे यांचा अंतर्भाव.
* 2011-12 मधील आकडेवारी - जुलै 2013 मध्ये प्रसिद्धी - ग्रामीण व शहरी भागासाठी खर्चाची पातळी 816 व 1000रु - यावरून 11-12 मध्ये भारतात एकूण दारिद्र्य 21.9%. (ग्रामीण - 25.7% व शहरी 13.7%)
* या गटाने मोजमापासाठी MRP रिकॉल पिरियडचा वापर केला.
* राष्ट्रीय शहरी दारिद्र्य रेषेलाच इतर दारिद्र्य रेषांचा आधार मानण्याची शिफारस.
  (लकडावाला पद्धतीतील दोन स्वतंत्र (शहरी व ग्रामीण) दारिद्र्य रेषा संचाचा त्याग केला.

## ५) सी. रंगराजन पॅनेल. मे २०१२ - सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट - अहवाल २०१४

सदस्य - महेंद्र देव, के सुंदरम, महेश व्यास, के. एल दत्ता.

* तेंडुलकर पद्धतीचा त्याग करुन लकडावाला पद्धतीची शिफारस (अन्न व गैर अन्न वस्तू)
* गटाच्या दारिद्र्य रेषा संचात तृणधान्ये, कडधान्ये, दूध / दुग्धजन्य पदार्थ, मीठ, साखर, अंडी, मांस फळे
  गैर अन्न ⇒ आरोग्य, शिक्षण, घरभाडे, इंधन, चपला, वाहतूक, तंबाखू, टिकाऊ वस्तू.
* NSSO च्या ६८ व्या फेरीच्या आकड्यांच्या आधारे २०११-१२ साठी दारिद्र्य रेषा व प्रमाण मोजले
* त्यासाठी MMRP चा वापर. त्यानुसार देशात २९.५% (ग्रामीण ३०.९ व शहरी २६.४)
* मात्र भारत सरकारने या पॅनेलच्या शिफारशी स्विकारलेल्या नाहीत.

२०११-१२ च्या अहवालात दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या - उ.प्र / बिहार / म.प्र / प. बंगाल / महाराष्ट्र

महाराष्ट्रात प्रमाण २०% (संख्या २२८ लाख) प्रमाण - छत्तीसगड / मणी / ओडिशा / म.प्र / झारखंड

Scanned by CamScanner

**...ा कृती दल:** (Task Force on Elimination of Poverty in India)

* १६ मार्च २०१५ ला स्थापन - (अध्यक्ष निती आयोगाचे उपाध्यक्ष अरविंद पनगडिया)

...स्य - विवेक देबरॉय, - निती आयोग सदस्य, रथिन रॉय, सुरजीत भल्ला, डॉ. टिसी ए. तसेच भारत सरकारच्या नऊ विभागांचे सचिव.

* प्रत्येक राज्यात समांतर कृती दल स्थापन करण्याचा निर्णय.

Scanned by CamScanner

# * जागतिक दारिद्र्य रेषा *

⇒ गणना = १९९० पासून - जागतिक बँकेमार्फत - त्यावेळी १ डॉलर/दिन
२००८ पासून — १.२५ — (PPP दरावर आधारित)
ऑक्टो २०१५ — १.९० — (२०११ च्या किंमतीनुसार)

# * भारतातील दारिद्र्य निर्मुलनाचे उपाय *

अ) सामान्य उपाययोजना :
ब) विशेष उपाययोजना :

## अ) सामान्य उपाययोजना ⇒

१) आर्थिक विकासाचा वेग वाढविणे -- राष्ट्रीय उत्पन्न वाढेल त्यामुळे उत्पादन, उपभोग व रोजगार वाढेल.
२) लोकसंख्या नियंत्रण — दरडोई उत्पन्नात वाढ होईल.
३) रोजगार संधीत वाढ करणे - ग्रामीण व शहरी भागात पायाभूत सुविधांची निर्मिती, लघुउद्योग व कुटिरोद्योगांना प्रोत्साहन देणे.
४) आर्थिक विषमता कमी करणे : व्यवसायाभिमुख व रोजगार निर्मिती करणारे शिक्षण देणे,
५) भूसुधारणा कायदे :
६) संतुलित प्रादेशिक विकास : ग्रामीण तसेच मागास भागात अधिकाधिक साधने उपलब्ध करून देणे.
७) ग्रामीण औद्योगिकरण : ग्रामीण भाग पूर्णतः शेतीवर अवलंबून . ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होईल.
८) सामाजिक सुरक्षा उपाययोजना - भविष्य निर्वाह, विमा योजना, निवृत्ती वेतन आरोग्य सुविधा- इ.

दारिद्र्य निर्मुलनासाठी सरकारचा त्रि-आयामी दृष्टीकोन :
i) वृद्धीधारीत दृष्टीकोन → आर्थिक वृद्धी.
ii) दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रम → रोजगार निर्मिती कार्यक्रम.
iii) किमान मुलभूत सुविधांची तरतूद → शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते इ.

## ब) विशेष उपाययोजना

① किमान गरजा कार्यक्रम : गरीब लोकांच्या न्यूनतम गरजांची पूर्तता करणे.

⇒ पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षी (१९७४-७५) या कार्यक्रमाची सुरूवात.
⇒ उपेक्षित व मागास घटकांचा विकास साधणे हे उद्दिष्ट.

कार्यक्रमाचे मुख्य घटक : - अ) ग्रामीण आरोग्य
ब) ग्रामीण पाणीपुरवठा
क) ग्रामीण विद्युतीकरण
ड) प्रौढ शिक्षण
इ) पोषण
ई) शहरी झोपडपट्टी सुधारणा
फ) भूमीहीन मजुरांना घरे.

अंमलबजावणी करताना दोन तत्वांचा वापर : ① पुरविण्यात येणाऱ्या सेवा सर्वप्रथम दुर्लक्षित भागात.

Scanned by CamScanner

४) पुरविण्यात येणाऱ्या सुविधा एकत्रित आंतरविभागीय प्रकल्पामार्फत.
उद्दिष्ट: जीवनमान स्तर उंचावणे.

② ग्रामीण रोजगार कार्यक्रम RWP - ग्रामीण भागातील रस्ते, लहान पाटबंधारे, जमीन सुधारणा, व भूसंधारण इ. उपायांच्या द्वारे रोजगार वाढ करणे.

③ एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम - ग्रामीण भागातील गरिबांना उत्पन्न मिळवून देणारी साधने घेण्यासाठी कमी व्याजदरावर आर्थिक मदत देणे - उद्देश.
उदा. शेळ्या, बैलगाडी इ. (वाणिज्य बँक, सहकारी बँक, ग्रामीण बँक)

Integrated Rural Development Programme IRDP

- देशातील काही भागात सुरुवात - 1978-79 मध्ये.
संपूर्ण देशासाठी नोव्हें 1980
अनुदानाची / खर्चाची विभागणी केंद्र व राज्य - 50:50.
आठव्या पंचवार्षिक योजनेनुसार 11,000 पेक्षा कमी उत्पन्न - पात्र.
पैकी 50% कुटुंबे अनुसूचित जाती / जमाती पैकी हवीत.
तसेच 40% स्त्रिया व 3% अपंग

④ दुष्काळग्रस्त भागातील कार्यक्रम - सुरुवात -1973-74 - देशातील दुष्काळाने वारंवार बाधित होणाऱ्या क्षेत्राचा विकास साधण्यासाठी - ~~...~~ Area Development programme

DPAP Drought Prone Area programme

1977-78 - मध्ये राजस्थान, गुजरात, हरयाणा, जम्मू-काश्मीरच्या वाळवंटी भागासाठी - DDP - Desert Development Programme.
1989 - Integrated watershed Development Programme. (IWDP) - पुढे यामध्ये DDP व DPAP चा समावेश केला.

⑤ स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण - Training of Rural Youth for Self Employment
(TRYCEM) ⇒ IRDP अंतर्गत
⇒ ग्रामीण भागातील 18 ते 35 वयोगटातील गरीब युवकांना कौशल्याधिष्ठित शिक्षण देणे.
→ 50% - from SC/ST
→ 50% Women.
⇒

⑥ ग्रामीण रोजगार निर्मिती कार्यक्रम: सुरुवात - 1999-2000
⇒ ग्रामीण भागात रोजगाराभिमुख उद्योगांची निर्मिती करून
⇒ ~~३०~~ नवीन उद्योग व सेवा निर्मितीचा समावेश (जुन्या केंद्राच्या विस्ताराचा समावेश नाही)
⇒ 25 लाखापर्यंत सहाय्य.

⑦ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम - (National Rural Employment Guarantee Act 2005
नंतर - Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Act)
सुरुवात: Food for work Programme चे रूपांतर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम
1980 मध्ये इंदिरा गांधींच्या काळात

सुरुवात
३)

सुरुवात 1981 पासून सहाव्या पंचवार्षिक योजनेत.
⇒ लोकांना रोजगार पुरविणे हे उद्दिष्ट.
⇒ सहभाग केंद्र व राज्य - 50:50
⇒ 1989 मध्ये जवाहर रोजगार योजनेत समावेश.

③ जवाहर रोजगार योजना :- 1 एप्रिल 1989 - NREP व ग्रामीण भूमिहीन रोजगार योजना मिळून राजीव गांधी यांनी जवाहर रोजगार योजनेची सुरुवात.
ह्या योजनेचे शहरी स्वरूप - नेहरू रोजगार योजना.
मागास जिल्ह्यात 90 ते 100 दिवसाचा हक्काचा रोजगार देणे हे उद्दिष्ट.
सहभाग funding केंद्र व राज्य - 80:20.

④ 20 कलमी कार्यक्रम :
सर्वप्रथम 1975 साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या योजनेची सुरुवात केली. जाने. 1982 मध्ये पुन्हा नव्याने सुरु करण्यात आला. १९८६ साली पुन्हा नव्याने रचना.
→ मुळ उद्देश ⇒ गरिबी दूर करणे.
त्यातील काही कलमे -
① ग्रामीण गरिबी दूर करणे.
② पावसावरील शेतीसाठी योजना
③ पाण्याचा योग्य वापर
④ भू सुधारणा
⑤ स्वच्छ पिण्याचे पाणी.
⑥ सर्वांसाठी आरोग्य
⑦ दोन मुले
⑧ शिक्षण प्रसार
⑨ SC/ST - न्याय
⑩ स्त्रीपुरुष समानता
⑪ ग्रामीण मजूरांसाठी विशेष योजना
⑫ अधिक उत्पादन (कृषी)
⑬ लोकांसाठी घर
⑭ झोपडपट्टीवासीयांचा विकास
⑮ वनासाठी नवीन योजना
⑯ पर्यावरण वाचवीणे.
⑰ ग्राहकांचा हक्क.
⑱ विजपुरवठा
⑲ उत्कृष्ट प्रशासन
⑳ क्रियासाठी नव्या संधी.

प्रधानमंत्री
⑩ रोजगार ~~हमी~~ योजना (PMRY)
सुरुवात - 2 Oct. 1993 - आठवी पंचवार्षिक योजना.
उद्देश - शिक्षित बेरोजगार तरुणांना व्यापारिक देवाणघेवाणीसाठी आर्थिक मदत उपलब्ध करणे.
PMRY ⇒ 18 ते 35 - वयोगट (पूर्वेकडील राज्यात 18 ते 40 वर्षे)
SC/ST, अपंग, महिला - 10 वर्षे अधिक.
⇒ 8 वी पर्यंत शिक्षित तरुणांसाठी 1 लाख रु पर्यंत कर्ज. (ग्रामीणाशिवाय)
⇒ 2 किंवा अधिक - भागिदारी व्यवसाय - 10 — " —
⇒ केंद्रिय उद्योग मंत्रालयामार्फत.
⇒ 1 एप्रिल 1994 पासून शहरी व ग्रामीण या दोन्ही भागांसाठी.
⇒ 15 ऑगस्ट 2008 मध्ये प्रधानमंत्री रोजगार निर्माण कार्यक्रमात समाविष्ट.

⑪ ग्रामीण गृह योजना - इंदिरा आवास योजना
⇒ सुरुवात 1985-86 - सातवी योजना.
उद्देश ⇒ दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना गृहबांधणीसाठी मोफत अनुदान.

Scanned by CamScanner

⇒ सध्या नाव - प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना : - १ एप्रिल २०१६ पासून

⇒ खर्च केंद्र व राज्य - 75:25 (पूर्वेकडील राज्यात 90:10)

१ एप्रिल १९८९ रोजी इंदिरा आवास योजना जवाहर रोजगार योजनेत समाविष्ट पण १९९६ मध्ये [illegible]

⇒ SC/ST, मुक्त वेठबिगार, → गटातील BPL

⇒ १९९३-९४ - मध्ये ४०% वित्त सहाय्य गैर - SC/ST साठी.

६०% - SC/ST

४०% - गैर SC/ST.

⇒ पुढे विस्तार - लढाईत मरण पावलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबासाठी

⇒ 3% घरे ग्रामीण दारिद्र्य रेषे खालील शारिरिक व मानसिक विकलांग.

⇒ २००६-०७ पासून BPL अल्पसंख्याक समावेश.

⇒ घर नोंदणी स्त्री सदस्य किंवा दोघांच्या (पती पत्नी) नावाने.

## (12) स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना : SJSRY

⟹ स्वातंत्र्याच्या सुवर्ण जयंतीच्या निमित्ताने ५ डिसें १९९७ पासून. - नववी योजना.

⟹ तीन योजनांचे एकत्रिकरण — (I) नेहरु रोजगार योजना. (NRY)

(II) शहरी पायाभूत सुविधा कार्यक्रम (UBSP)

(III) प्रधानमंत्री एकीकृत शहरी गरिबी निवारण कार्य (PMIUPEP)

⟹ उद्देश : शहरी दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना स्वरोजगार उद्योगांच्या उभारणीस प्रोत्साहन देणे.

⟹ खर्च विभागणी - केंद्र व राज्य - 75:25%

⟹ या अंतर्गत दोन कार्यक्रम ⟹ I) शहरी स्व रोजगार कार्यक्रम. (USEP)

II) शहरी वेतन रोजगार कार्यक्रम (UWEP)

## (13) राष्ट्रीय शहरी आजिविका अभियान (NULM - National Urban livelihood mission)

⇒ 23 सप्टें २०१३ पासून SJSRY चे NULM मध्ये रुपांतर. - देशातील ७९१ शहरांत.

⇒ २० फेब्रु २०१६ रोजी दीन दयाल अंत्योदय योजना : राष्ट्रीय शहरी आजिविका अभियान सध्या ४०४१ शहरात.

## (14) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना. SJSY.

⇒ एक एप्रिल १९९९ पासून : सहा योजनांचे एकत्रिकरण.

① एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) ✓

② स्वयंरोजगारासाठी ग्रामीण तरुणांना प्रशिक्षण (TRYCEM) ✓

③ ग्रामीण क्षेत्रातील स्त्रिया व मुलांचा विकास (DWCRA)

④ दशलक्ष विहिर योजना (MWS)

⑤ गंगा कल्याण योजना (GKY)

⑥ ग्रामीण कारागिरांना सुधारित अवजारांचा पुरवठा (SITRA)

Scanned by CamScanner

MWS – Million Well Scheme · दशलक्ष विहिर योजना:

सुरुवात – 1 एप्रिल 1989 – सातवी योजना.
BPL – लहान शेतकरी · सिंचन सुविधा ·
50 : 50 सहभाग

GKY – Ganga Kalyan Yojana → गंगा कल्याण योजना:

सुरुवात – 1 फेब्रु 1997 – आठवी योजना
भूगर्भातील / भूपृष्ठावरील जलस्रोतांचा शोध घेण्यासाठी आर्थिक सहाय्य ·
80 : 20 सहभाग

SITRA – Supply of Improved Toolkits of Rural Artisans

ग्रामीण कारागिरांना सुधारित साधनांचा संच पुरविणारी योजना ·

सुरुवात · जुलै 1992 · आठवी योजना ·
90 : 10 सहभाग

SGSY योजनेची उद्दिष्टे:

① स्वयंरोजगाराचा सर्वांगिण विचार
② पतपुरवठा व अनुदानांच्या साह्याने 3 वर्षात BPL मधून APL मध्ये आणणे उद्दिष्ट.
③ मिळणारे अनुदान प्रकल्प किंमतीच्या 30% किंवा 7500 कमाल.
SC/ST साठी 50% किंवा 10 000 कमाल ·
④ 50% SC/ST – स्त्रिया 40% अपंग 3%

⇒ राष्ट्रीय ग्रामीण आजिविका अभियान: ग्रामीण विकास मंत्रालयाने राधाकृष्ण समितीच्या शिफारशींच्या आधारे 2010-11 मध्ये SGSY ची पुनर्रचना करून 3 जून 2011 रोजी NRLM असे नाव.
नोव्हें 2015 मध्ये दीनदयाल अंत्योदय योजना – राष्ट्रीय ग्रामीण आजिविका अभियान DAY-NRLM

15. भारत निर्माण योजना-

– 16 डिसें 2005 पासून: → ग्रामीण पायाभूत संरचनेसाठी एक बिझनेस प्लॅन.
ग्रामीण भागात & क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास.
1) पेयजल: 2012 पर्यंत सर्व जलाभावित वस्त्यांना पेयजल पुरवठा.
2) गृहनिर्माण: 2009-11 – गरिबांसाठी 60 लाख चाढिवे घरे. 2014 पर्यंत 1.2 कोटी घरांचे लक्ष्य.
3) दूरसंचार: 2014 – पर्यंत 40% ग्रामीण टेली घनता साध्य करणे.
2.5 लाख पंचायतींना ब्रॉडबँड कव्हरेज
2012 – पंचायत स्तरावर भारत निर्माण केंद्र.

Scanned by CamScanner

४) रस्ते: २०१२ पर्यंत १००० लोकसंख्या असलेली सर्व गावे (डोंगराळ - ५०० लोकसं) बारमाही
५) विद्युतीकरण: २०१२ पर्यंत सर्व गावांपर्यंत वीज - १.७५ गरीब कुटुंबांना कनेक्शन
६) जलसिंचन: —॥— १ कोटी हेक्टर जमीन नव्याने सिंचनाखाली.

## 16. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना PMGSY.

सुरुवात २५ डिसें २००० - १००% केंद्रपुरस्कृत.
उद्देश: सर्व खेडेगावांना बारमाही रस्त्यांनी जोडणे.
निधी - केंद्रीय रस्ते निधी मध्ये जमा झालेल्या हाय स्पीड डिझेल वरील उपकराच्या (cess) ५०% रक्कम या योजनेसाठ वापरली जाते.
- सपाट प्रदेश - ५०० पेक्षा अधिक वस्ती
डोंगराळ / आदिवासी / वाळवंटी / डाव्या अतिरेकाने प्रभावित प्रदेश - २५० पेक्षा अधिक लोकसं.
सिंगल / बारमाही रस्त्यांनी जोडणे.

# (क) बेकारी - Unempolyment

व्याख्या / अर्थ: अशी स्थिती की जेथे व्यक्ती प्रचलित मजुरीच्या दरावर काम करायला तयार असते परंतु त्याला काम मिळत नसते.

⇒ व्यक्तीची काम करण्याची इच्छा, पात्रता व प्रचलित वेतन दरावर काम करण्याची तयारी असूनही त्या व्यक्तीला प्रत्यक्षात काम न मिळण्याची स्थिती म्हणजे बेकारी होय.

बेकारीची संकल्पना:

१) अनैच्छिक बेकारी: दृश्य किंवा उघड बेकारी.
काम करण्याची पात्रता → आहे
काम करायला तयार → आहे } परंतु काम प्राप्त होत नाही.

अशी स्थिती — श्रमाचा अतिरिक्त पुरवठा
श्रमिकांची कमी मागणी } यातून निर्माण होते.

भारतात शहरी व ग्रामीण दोन्ही भागात ही बेकारी दिसून येते.

२) ऐच्छिक बेकारी: —
काम करण्यास पात्र → आहे
काम करायला तयार → नाही. } निष्क्रियतेची स्थिती.

Scanned by CamScanner

उदा. 1) श्रीमंत व्यक्ती काम करायला तयार नसतात.
2) भिकारी ———〃———
3) सुशिक्षित व्यक्ती पांढरपेशा व्यवसायाची वाट पाहतात.

## 7) न्यून किंवा अर्ध बेकारी :

व्यक्तीची काम करण्याची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही किंवा कनिष्ठ पातळीवर काम करावे लागते.
उदा. पदव्युत्तर व्यक्तीने पहारेकऱ्याचे काम करणे.

## 8) पूर्ण रोजगार :

देशातील उत्पादन कार्यात उपलब्ध उत्पादन साधनांचा परिपूर्ण वापर करणे म्हणजे पूर्ण रोजगार.
भूमी, श्रम, भांडवल या उत्पादक साधनांच्या प्रचलित मजुरीच्या दरावर रोजगार मिळतो तेव्हा ती पूर्ण रोजगारी.

## * बेकारीचे प्रकार *

1. ग्रामीण बेकारी : (अ) हंगामी (ब) प्रच्छन्न
2. शहरी बेकारी - अ) सुशिक्षितांची ब) तांत्रिक क) घर्षणात्मक
3. चक्रीय बेकारी -
4. रचनात्मक बेकारी -

### 1) ग्रामीण बेकारी : अ) हंगामी.

ग्रामीण शेतमजूरांना केवळ चार ते पाच महिनेच काम प्राप्त : शेतीपावसावर अवलंबून - वर्षातून एकच पीक

### ब) प्रच्छन्न / छुपी.

ज्या ठिकाणी काम करण्यासाठी कमी लोकांची आवश्यकता असते तेथे आवश्यकतेपेक्षा जास्त लोक काम करतात. त्यावेळी अतिरिक्त श्रमिकांची सीमान्त उत्पादकता शून्य असते. → शेती

### 2) शहरी बेकारी – अ) सुशिक्षित :

सुशिक्षित असूनही काम न मिळणे. ही बेकारी दहावी, बारावी पास, पदवी, पदव्युत्तर झालेले लोक

### ब) तांत्रिक.

उत्पादनाच्या तंत्रात बदल झाल्याने निर्माण होणारी बेकारी. उदा. कारखानदार श्रमिकांऐवजी यंत्रांना प्राधान्य देतात त्यामुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते.

### क) घर्षणात्मक / संघर्षात्मक

आर्थिक संघर्षामुळे श्रमिकांना तात्पुरत्या स्वरूपात बेकार व्हावे लागते. - यंत्रातील बिघाड, कच्च्या मालाची टंचाई, वीज कपात इ. मुळे श्रमिकांना कामावरून कमी केले जाते. एक काम सुटल्यानंतर दुसरे शोधेपर्यंत संघर्ष करावा लागतो.

Scanned by CamScanner

## ३) चक्रीय बेकारी :

तेजीच्या अवस्थेनंतर येणाऱ्या मंदीच्या अवस्थेत प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या बेकारीला चक्रीय बेकारी म्हणतात. हा प्रकार व्यापार चक्रामुळे निर्माण होतो.

## ४) संरचनात्मक बेकारी

संरचनात्मक व तंत्रज्ञानात्मक बदल होतात ती बेकारी निर्माण होते.
उदा. घोडागाडी कालबाह्य होवू लागली.

⇒ कामगार म्हणजे काय ?

उच्च किंवा निम्न अशा कोणत्याही स्तरावरील आर्थिक क्रियांमध्ये गुंतलेल्या व त्याद्वारे राष्ट्रीय उत्पादनात भर घालणाऱ्या सर्व व्यक्तींना कामगार असे म्हणतात.

### कामगारांचे वर्गीकरण :

① नियमित पगारदार / मजुरी कामगार ⇒ इतरांच्या कृषी किंवा गैर कृषी उपक्रमामध्ये काम करतात आणि त्या बदल्यात नियमित आधारावर पगार किंवा मजुरी मिळवितात.

② किरकोळ मजुरी कामगार ⇒ इतरांच्या कृषी किंवा गैरकृषी उपक्रमामध्ये काम करतात आणि मालकाशी दैनिक किंवा ठराविक कालावधीनुसार मजुरी मिळवतात.

③ स्वयंरोजगारी ⇒ व्यक्ती स्वत:चे कृषी किंवा गैरकृषी उपक्रम चालवितात किंवा स्वतंत्र व्यवसाय किंवा व्यापारात एकटे किंवा भागीदारासहीत गुंतलेले असतात. त्यांचे तीन गट :
- i) स्वाधीन कामगार ⇒ भाडोत्री कामगाराविना व्यवसाय चालविणारे.
- ii) रोजगार देणारे ⇒ भाडोत्री कामगारांच्या साहाय्याने —॥—
- iii) मदतनीस ⇒ स्वत:च्या उपक्रमामध्ये पूर्ण किंवा अंशकालीन काम करणारे. ज्यांना कोणताही मोबदला मिळत नाही.

### काही व्याख्या :

भारतात रोजगार व बेरोजगारीची आकडेवारी तयार करताना केवळ १५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकसंख्येचाच विचार केला जातो.

① श्रम शक्ती : यामध्ये काम करणाऱ्या, काम शोधत असलेल्या व कामासाठी उपलब्ध असलेल्या सर्वांचा समावेश.
श्रम शक्ती = कामगार + बेरोजगार.

② श्रम शक्ती बाहेरील व्यक्ती – १५ + लोकसंख्येतील अशा व्यक्ती जे काम करतही नाहीत व काम शोधतही नाहीत. उदा. विद्यार्थी, गृहिणी, पेन्शनर्स, भिकारी.

③ श्रम शक्ती सहभाग दर – देशाच्या एकूण लोकसंख्येत (१५+) श्रम शक्तीचे प्रमाण – हे प्रमाण १००० लोकसंख्येमागे मोजले जाते.

$$\text{श्रम शक्ती सहभाग दर} = \frac{\text{श्रम शक्ती} \times 1000}{\text{एकूण लोकसंख्या}}$$

Scanned by CamScanner

**कार्यशक्ती**: श्रम शक्तीपैकी प्रत्यक्ष रोजगारात गुंतलेल्या व्यक्तींची संख्या.

कार्यशक्ती = श्रम शक्ती − बेरोजगार

**कामगार लोकसंख्या प्रमाण**: (WPR - Worker Population Ratio) - एकूण लोकसंख्येपैकी (१५+) प्रत्यक्ष कामगार व्यक्तींचे हजारी प्रमाण:

$$\text{कामगार लोकसंख्या} = \frac{\text{कामगार} \times 1000}{\text{एकूण लोकसंख्या}}$$

**बेरोजगारी दर** - श्रम शक्तीपैकी कामासाठी उपलब्ध असलेल्या मात्र रोजगार प्राप्त न झालेल्या व्यक्तींचे हजारी प्रमाण -

$$\text{बेरोजगारी दर} = \frac{\text{बेरोजगार} \times 1000}{\text{श्रम शक्ती}}$$

**बेरोजगार प्रमाण** - एकूण लोकसंख्येपैकी (१५+) बेरोजगार व्यक्तींचे हजारी प्रमाण.

$$\text{बेरोजगार प्रमाण} = \frac{\text{बेरोजगार} \times 1000}{\text{एकूण लोकसंख्या}}$$

## संघटित व असंघटित क्षेत्र

**संघटित** ⇒ संघटित क्षेत्रातील कामगारांचे कामगार कायद्यामुळे संरक्षण केले जाते. सर्व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगामध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचा तसेच १० किंवा अधिक कामगारांना रोजगार देणाऱ्या खाजगी क्षेत्रातील उद्योगांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचा संघटित क्षेत्रात समावेश होतो. हे कामगार आपल्या ट्रेड युनियनची स्थापना करून चांगली मजुरी व सामाजिक सुरक्षेच्या उपायांसाठी आपल्या मालकांशी वाटाघाटी करू शकतात. (पेंशन, फंड, मातृत्व लाभ इ.)

**असंघटित** ⇒ यामध्ये हजारो शेतकरी, शेतमजूर, छोट्या उपक्रमांचे मालक, भाडेत्री कामगार तसेच स्वयं रोजगारी व्यक्तींचा समावेश.

## बेरोजगारीची कारणे

i) लोकसंख्या
ii) शेती मशागतीचे मागास तंत्र - परंपरागत तंत्र, उत्पादकता कमी.
iii) वारसा हक्क कायदा - जमीनीचे विभाजन,
iv) संयुक्त कुटुंब पद्धती - प्रच्छन्न बेकारीला कारणीभूत.
v) आर्थिक विकास मंद -
vi) उत्पादन तंत्र: उद्योगामध्ये यांत्रिकीकरणाचा वाढता प्रभाव.
vii) घर्षण (संघर्ष) - औद्योगिक विवाद, वीजटंचाई, कच्चा माल तुटवडा इ.
viii) सदोष आर्थिक नियोजन -
ix) ग्रामीण लोकसंख्येचे स्थलांतर - नागरी भागातील बेकारीत वाढ.
x) शिक्षणाचा प्रसार - सुशिक्षितांमध्ये वाढ - कामाच्या संधी कमी.

Scanned by CamScanner

## परिणाम :

**आर्थिक** ⇒ i) संसाधनांचा अपव्यय : मानवी संसाधने वाया जातात.
ii) कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी अवघड ⇒
iii) दारिद्र्य व उत्पन्न विषमता :
iv) अनौपचारिक क्षेत्राची वाढ : बेरोजगार किरकोळ कामे करून उदरनिर्वाह करतात.
v) आर्थिक गुन्हेगारीत वाढ :
vi) अनुत्पादक लोकसंख्येचा वाढता भार.

**सामाजिक** ⇒ i) सामाजिक तणाव व अशांतता.
ii) मानवी मूल्यांचा ऱ्हास – कामी प्रतीची भावना
iii) दुबळेपणात वाढ. – बेरोजगार वास्तवापासून दूर - नशीबाला दोष.

## भारतात रोजगार व बेरोजगारीचे मोजमाप :

मोजमापाच्या आकड्यांचे तीन प्रमुख स्रोत : ① दशवार्षिक जनगणना
② NSSO चा अहवाल
③ रोजगार व प्रशिक्षण संचालनालय यांकडील एम्प्लॉयमेंट एक्सचेंजकडे झालेल्या नोंदी.

यापैकी NSSO चे अहवाल सर्वात महत्त्वाचे.
⇒ आकडेवारी NSSO साधारणतः पंचवार्षिक सर्वेक्षणाच्या माध्यमातून.
⇒ असे पहिले सर्वेक्षण. २७ व्या फेरीमध्ये ऑक्टो ७२ ते सप्टें ७३ या कालावधीसाठी.
⇒ त्यासहित आतापर्यंत ९ सर्वेक्षण पूर्ण.
⇒ ६८ व्या फेरीमध्ये जुलै २०११ ते जून १२ या कालावधीसाठी.

**NSSO आकडे जमा करण्यासाठी तीन प्रमुख पद्धतींचा वापर :**

1) **नित्य प्रमुख व दुय्यम दर्जा** : (UPSS - Usual Principal and Subsidiary Status)
* ⇒ नित्य प्रमुख दर्जा हा व्यक्तीने सर्वेक्षण पूर्व ३६५ दिवसांमध्ये केलेल्या आर्थिक कृतीशी संबंधीत
⇒ ३६५ दिवसात १८३ दिवस एखाद्या आर्थिक कामात गुंतलेले असतात त्यांना रोजगारात असल्याचे मानले जाते. (प्रमुख दर्जावर)
* या संदर्भ ३६५ दिवसात ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी एखादी दुय्यम आर्थिक कृती केलेली असेल तर तो दुय्यम दर्जावरही रोजगारात असल्याचे मानले जाते.

2) **चालू साप्ताहिक दर्जा** : (CWS - Current Weekly Status)
⇒ सर्वेक्षणपूर्व ७ दिवसांच्या आर्थिक कृतींचा समावेश.
⇒ पैकी कोणत्याही एका दिवसात किमान एक तास काम करणाऱ्याला रोजगारी समजले जाते.

3) **चालू दैनिक दर्जा** : (CDS - Current Daily Status)
⇒ सर्वेक्षणपूर्व ७ दिवसांच्या आर्थिक कृतींचा समावेश.
⇒ आठवड्यात दररोज किमान ४ तास काम करणे - रोजगारी

Scanned by CamScanner

# भारतातील बेकारी नष्ट करण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजना :

1) ग्रामीण रोजगार कार्यक्रम : (RWP)
⇒ रस्ते, बंधारे इ. कामे निर्माण करून रोजगार निर्मिती.

② सीमान्त शेतकरी व शेतमजूर.
⇒ अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूरांना स्वयंरोजगार सुरू करण्याकरीता कर्जपुरवठा.

③ एकात्मिक अवर्षणग्रस्त शेती विकास कार्यक्रम :
⇒ अवर्षणग्रस्त क्षेत्रात भूसंधारण, जमीन सुधारणा, रोजगार निर्मिती इ. कार्यक्रम.

④ कृषी सेवा केंद्र. (ASC)
⇒ बेरोजगारांना कृषीपूरक उद्योग सुरू करण्यासाठी मदत.

5) धडक योजना
⇒ लघुसिंचन योजना, भूसंधारण, रस्ते निर्मिती, इ. कार्यक्रमामार्फत 10 महिने रोजगार.

⑥ महाराष्ट्र - रोहयो. (EGS)
⇒ 1972-73 मध्ये सुरुवात, कामाचा अधिकार या तत्वावर आधारित.

7) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम : (NREP)
⇒ कामाच्या बदल्यात धान्य

⑧ ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना : (RLEGP)
⇒ 15 ऑ. 1983 ग्रामीण भागात रोजगार उत्पादक मालमत्ता निर्मिती करण्याच्या उद्देशाने.

⑨ जवाहर रोजगार योजना (JRY)
⇒ 28 एप्रिल 1989 प्रामुख्याने SC/ST, वेठबिगार, 30% स्त्रिया → BPL साठी.

⑩ स्वयंरोजगारासाठी ग्रामीण युवकांना प्रशिक्षण : (TRYSEM)
⇒ 2 लाख ग्रामीण युवकांना प्रशिक्षण देणे - मुख्य उद्देश.

## * महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना * (NREGS)

सुरुवात ⇒ 7 सप्टें 2005 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याची नोंदणी. (NREGA)
⇒ 2 फेब्रु 2006 - 200 जिल्ह्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू
⇒ दोन योजना यामध्ये समाविष्ट झाल्या - ① संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (SGRY)
② नॅशनल फूड फॉर वर्क प्रोग्रॅम (NFFWP)

⇒ 1 एप्रिल 2008 पासून संपूर्ण देशभरात.
⇒ 2 ऑक्टो 2009 पासून - म. गांधींच्या 140 व्या जन्मदिवसावर नाव म. गांधी रा. ग्रा. रो. ह. योजना.

उद्दिष्टे ⇒ 1) ग्रामीण कुटुंबातील तरुण सदस्य अकुशल अंगमेहनतीचे काम करू इच्छिणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील किमान एका सदस्याला प्रत्येक आर्थिक वर्षात 100 दिवसांचा रोजगार पुरविण्याची सरकारची हमी.

2) प्रत्येक परिवार नोंदणी करू शकतो. - नोंदणी 5 वर्षे वैध - ग्रामपंचायत फोटोग्राफयुक्त जॉब कार्ड जारी करेल.

3) अर्ज केल्यानंतर 15 दिवसाच्या आत त्याच्या घरापासून 5 किमी अंतराच्या परिसरात रोजगार पुरविला जाईल.

Scanned by CamScanner

⇒ अन्यथा राज्य सरकारांनी जाहीर केल्याप्रमाणे प्रतिदिन बेरोजगारी भत्ता दिला जाईल. भत्याचा दर दर आर्थिक वर्षातील पहिल्या 30 दिवसांसाठी मजुरीच्या २५% पेक्षा कमी नसावा तर पुढील कालावधीसाठी मजुरी दराच्या ५०% पेक्षा कमी नसावा. रोजगार ५ किमी क्षेत्राच्या बाहेर उपलब्ध करून दिल्यास १०% अतिरिक्त मजुरी दिली जाईल.

4) २००८ पर्यंत मजुरीचा दर राज्यातील किमान मजुरी दराइतके.
२००८ पासून कृषी कामगारांच्या ग्राहक किंमत निर्देशांकाच्या आधारावर
सर्वाधिक मजुरीचा दर (मार्च २०१६) — हरियाणा - २६०रु महाराष्ट्रात १९२रु.

5) महिलांसाठी ३३% आरक्षण.

6) कामाची निवड ग्रामसभेमार्फत - २०१६ मध्ये ६०% कृषी व संलग्न कामाशी संबंधित.

7) कामावर खर्चाची विभागणी – मजुरी व मटेरियल — ६०:४०

8) खर्चाची विभागणी केंद्र व राज्य - ९०:१०

9) परिक्षण करण्यासाठी केंद्रिय रोजगार हमी परिषद — राज्यात – राज्य परिषद.

10) जिल्ह्यात पर्यवेक्षण करण्यासाठी - जिल्हा परिषद सदस्यांची स्थायी समिती नेमण्यात येईल.

11) तालुकास्तरावर योजना अधिकाऱ्याची नेमणूक.

12) ग्रामसभेच्या शिफारशीनुसार प्रकल्पाची निवड व अंमलबजावणी व पर्यवेक्षण – जबाबदारी - ग्रामपंचायत.

13) केंद्र सरकार – 'राष्ट्रीय रोजगार हमी निधी' राज्य-सरकार — 'राज्य रोजगार हमी निधी'

⇒ २०१५-१६ ⇒ योजनेअंतर्गत ४.८१ कोटी कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला २३३.३४ कोटी श्रमदिवस

## कौशल्य विकास

### राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण (National Skill Development Policy)

सुरुवात: फेब्रुवारी २००९ मध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास धोरण.
: २०२२ पर्यंत ५०० दशलक्ष कुशल व्यक्तींची निर्मिती.

उद्दिष्ट्ये: 1) कौशल्य विकास समावेशी बनविणे. कामगारामधील आर्थिक व सामाजिक विभागणी दूर करणे. ग्रामीण शहरी, पुरुष महिला, संघटित-असंघटीत.

2) उद्योगातील कौशल्याची वाढती मागणी भागविणे.

3) राष्ट्रीय व्यावसायिक अर्हता आराखडा निर्माण करणे.

राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ: ३१ जुलै २००८ रोजी सार्वजनिक खाजगी भागीदारीच्या आधारावर नफ्यासाठी नसलेली कंपनी म्हणून स्थापन.

## दीन दयाळ अंत्योदय योजना

पार्श्वभूमी - SJSRY – Dec-1997 — 2013 – NULM – 2016 - DAY NULM
SGSY – 1999 — 2012 – NRLM – 2015 – DAY NRLM

# दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण आजिविका अभियान :

उद्दिष्ट्ये: ग्रामीण गरिबांना विशेषत: महिलांना स्व-सहायता गटांच्या माध्यमातून संघटित करून त्यांच्या उत्पन्नात पुरेशी वाढ होईपर्यंत, त्यांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारेपर्यंत, दारिद्र्यातून बाहेर येईपर्यंत त्यांना मदत करणे.

⇒ १० वर्षांच्या कालावधीत ८ते१० कोटी ग्रामीण महिलांना मदत - लक्ष्य.

वैशिष्ट्ये ⇒ ① जागतिक बँकेची मदत

② SHGs आणि त्यांच्या संघाच्या कॉर्पसमध्ये भर घालण्यासाठी रिव्हॉल्विंग फंड, समुदाय गुंतवणूक निधी दिला जातो.

③ अल्प व्याज दराने कर्ज.

④ बँकेशी जोडण्यास व कर्ज देण्यास मदत.

⑤ ७% दराने कर्ज / फरकाची रक्कम व्याज अनुदान म्हणून सरकारमार्फत.

⑥ २५० निवडक जिल्ह्यांत वेळेवर कर्जफेडीवर अधिक ३% सवलत.

⑦ महिला किसान सशक्तीकरण परियोजना - अभियानाचा भाग: कृषी उत्पादकतेमधील सहभाग सुधारण्याची तरतूद.

## दीनदयाळ अंत्योदय योजना : राष्ट्रीय शहरी आजिविका अभियान : DAY- NULM

(Deendayal Antyoday Yojana- National Urban livelihood mission)

- 20 फेब्रुवारी २०१६ रोजी - NULM चे DAY-NULM मध्ये रूपांतर.
- पूर्वीचे अभियान - ७९१ शहरामध्ये
- नवीन अभियान - ४०४१ —॥—

उद्दिष्ट्ये ⇒ 1) शहरी गरिबांना स्वयंरोजगार व कुशल मजुरी रोजगार उपलब्ध करून देवून दारिद्र्य कमी करणे.

2) स्थानिक स्तरावर संस्थांची बांधणी करणे (SHGs) - व उपजिविकेमध्ये सुधारणा

अभियानाचे भाग :

i) कौशल्य प्रशिक्षण आणि प्लेसमेंट द्वारे रोजगार

ii) स्वयंरोजगार कार्यक्रम = २ लाख रु. पर्यंतच्या कर्जासाठी ५ ते ७% व्याज अनुदान.

iii) सामाजिक संघटन व संस्थात्मक विकास

iv) शहरी बेघरांना निवारा : ५० बेघर व्यक्तींना सामावून घेतील असे बांधकाम

v) शहरी वेंडर्सना मदतीसाठी पायाभूत संरचना निर्माण करणे.

vi) क्षमता बांधणी व प्रशिक्षण कार्यक्रम.

## दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना: (DDU- GKY)

→ ग्रामीण विकास मंत्रालयाची मागणी आधारीत प्लेसमेंटशी जोडलेली कौशल्य प्रशिक्षणाची योजना - DAY- NRLM चा एक भाग.

पूर्वीच्या NRLM च्या स्पेशल प्रोजेक्ट्स या योजनेची पुनर्रचना करून २५ सप्टें २०१४ ला योजना घोषित करण्यात आली.

Scanned by CamScanner

उद्दिष्ट्ये - i) ग्रामीण गरिब कुटुंबाच्या उत्पन्नामध्ये वैविध्य आणणे.
ii) ग्रामीण तरुणांच्या करिअर विषयक आकांक्षांची पुर्तता करणे.

वैशिष्ट्ये:
1) खाजगी शिक्षण व प्रशिक्षण संस्थांना आधुनिक कौशल्य प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यासाठी.
2) या केंद्रात १५ ते ३५ वयोगटातील व्यक्तींना संगणक वापर, इंग्रजी बोलणे इ. मोफत प्रशिक्षण अपंगासाठी वयाची अट नसेल.
3) प्रशिक्षणानंतर नोकरी मिळविण्यासाठी मदत.
4) सध्या १९०० प्रशिक्षण केंद्रे कार्यरत. ३३० हून अधिक ट्रेड्स.
5) योजनेअंतर्गत जम्मू काश्मिर मधील व्यक्तींसाठी हिमायत नावाचा तर डाव्या अतिरेकाने प्रभावित (नक्षल) व्यक्तींसाठी रोशनी नावाचा विशेष प्रशिक्षण प्लेसमेंटचा कार्यक्रम.
6) सामाजिक समावेशनासाठी ५०% निधी SC/ST, १५% अल्पसंख्याक ३% अपंग शिवाय ३३% स्त्री

## * प्रधानमंत्री कौशल विकास योजना:

⇒ 20 मार्च 2015 ला मान्यता.
⇒ तरुणांच्या कौशल्य प्रशिक्षणाची फ्लॅगशीप योजना } कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय मार्फत - राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाद्वारे (NSDC)

वैशिष्ट्ये:
1) कौशल्य सर्टिफिकेट योजना.
2) १४ लाख व्यक्तींना प्रशिक्षण देण्याची तरतुद. विशेषत १० वी १२ वी तून गळती झालेल्यांसाठी
3) NSDC च्या ट्रेनिंग पार्टनर्सच्या माध्यमातून - अशी १८७ पार्टनर्स व २३०० प्रशिक्षण केंद्रे. केंद्र व राज्य शासनाच्या प्रशिक्षण केंद्राचाही सहभाग.

योजनेचा भाग -
i) अल्पकालीन प्रशिक्षण: ६० लाख तरुणांना प्रशिक्षणाची संधी.
ii) योजनेची पोहोच सर्वदूर पोहचविण्यासाठी कौशल्य व रोजगार मेळावे.
iii) प्लेसमेंट सहाय्य - संभाव्य रोजगार प्रदात्यांशी जोडणे.

## * श्यामा प्रसाद मुखर्जी रुर्बन अभियान * (NRuM)

१६ सप्टें २०१६ रोजी संमत. (घोषणा २१ फेब्रु २०१६ - छत्तीसगड - राजनंदगाव - कुरुभाट मधून)
⇒ Rurban ⇒ Rural + Urban.
⇒ क्लस्टर- आधारीत विकासाची योजना - ग्रामीण आत्मा व शहरी सुविधा - स्मार्ट गावे विकसित करण्याची योजना.

वैशिष्ट्ये:
1) क्लस्टर: योग्यपणे सीमांकित असलेले व नियोजीत लेआऊट असलेली क्षेत्रे. राज्यशासनामार्फत अधिसुचीत - व निवड
2) क्लस्टर निवड - सपाट व किनारी भागात २५००० ते ५०००० लोकसंख्या
डोंगराळ/आदिवासी/वाळवंटी - ५००० ते १५००० —"—
3) पुढील 3 वर्षात ३०० Rurban क्लस्टर निर्माण करण्याचे लक्ष्य.
4) पर्याप्त विकासासाठी १४ क्षेत्रांवर भर.

⇒ कौशल्य विकास/कृषी प्रक्रिया, डिजिटल साक्षरता, स्वच्छता, पाईप पाणी पुरवठा, कचरा व्यवस्थापन, रस्ते व गटारी, पथदिवे, आरोग्य केंद्रे, शिक्षण, रस्ते जोडणी, नागरिक सेवा केंद्र, सार्वजनिक वाहतूक, LPG कनेक्शन, कनेक्टिविटी